



■ २२ कॅरेट सोने दर : १,३६,५००/- ■ चांदी दर : २,४०,०००/-


शब्दांना सत्याची धार

# प्रहार

सिंधुदुर्ग ● सोमवार २३ मार्च, २०२६

RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३३७८७ ● वर्ष २२ ● अंक १३३ ● पाने ८ ● ₹ ५.००

www.prahaar.in epaper.prahaar.in




साठवणूकीत दिलासा; उद्योगांना फटका

पान ७

# तेल अन् गॅस संकटात दिलासा

## रशिया, अमेरिकेचे टँकर भारतात दाखल



**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

मध्य पूर्वेत सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारतासाठी एक सुखद बातमी समोर आली आहे. रशियाचा तेल टँकर २२ मार्च रोजी न्यू मँगलोर पोर्टवर पोहोचले. हा टँकर आधी चीनकडे जात होता, परंतु अचानक त्याने भारताच्या दिशेने प्रवास सुरू केला. याबरोबरच अमेरिकेतून एलपीजी घेऊन आलेले जहाज देखील या पोर्टवर पोहचले. यामुळे ऊर्जा पुरवठ्यासंबंधी दिलासा मिळाला आहे.

होर्मुझ सामुद्रधुनीत बंद राहिल्यानंतर भारतीय झेंड्याची जहाजे या मार्गाने जाण्याची परवानगी दिली, ज्यामुळे पुरवठा पूर्णपणे ठप्प झालेला नाही. भारत आपल्या आवश्यकतेचा सुमारे ८८ टक्के कच्चे तेल, ५० टक्के गॅस आणि ६० टक्के एलपीजी आयात करतो. पूर्वी यांचा मोठा हिस्सा सौदी अरेबिया, इराक आणि युएईमधून येत होता, जो होर्मुझच्या मार्गाने पाठवला जातो. संकटाच्या कारणाने एलपीजीचा पुरवठा प्रभावित झाला, परंतु आता रशिया, अमेरिकेच्या पर्यायामुळे दिलासा मिळाला आहे.

या आधीही 'अक्वा टायटन' नावाचे जहाज रशियन कच्चे तेल घेऊन मंगळुरू येथे पोहोचले होते. तसेच 'शिवालिक' आणि 'नंदा देवी' यांसारख्या भारतीय एलपीजी टँकर्सनीही गुजरातमधील बंदरांवर महत्त्वाचा पुरवठा केला आहे. या सर्व हालचाली भारताच्या ऊर्जा सुरक्षेसाठी केलेल्या व्यापक प्रयत्नांचा भाग आहेत.

## मोदींची पश्चिम आशियातील परिस्थितीवर उच्चस्तरीय बैठक

### शहा–नड्डा, पुरी यांच्यासह वरिष्ठ नेते उपस्थित; गॅस–तेल आणि ऊर्जा स्थितीवर चर्चा

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :** अमेरिका-इस्रायलच्या इराणसोबतच्या युद्धामुळे पश्चिम आशियात निर्माण झालेल्या संघर्षाच्या परिस्थितीवर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक सुरू आहे. यामध्ये पेट्रोलियम, कच्चे तेल, वायू, वीज आणि खतांच्या स्थितीचा आढावा घेतला. या बैठकीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, अर्थमंत्री निर्मला सीतारमण, आरोग्यमंत्री जे.पी. नड्डा, पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी, कृषी मंत्री शिवराज सिंग चौहान, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, नागरी विमान वाहतूक मंत्री राममोहन नायडू, रेल्वे आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासह इतर वरिष्ठ नेते उपस्थित होते.

### परिस्थिती कधीपर्यंत सुरळीत होणार?


सरकारने परिस्थिती हाताळण्यासाठी मोठा निर्णय घेतला आहे. राज्यांना ५० टक्के कमर्शियल एलपीजी वाढवून दिले आहेत. ज्यामुळे उद्योग व बाजाराच्या गरजा पूर्ण केल्या जाऊ शकतील. याशिवाय, देशांतर्गत उत्पादनातही वाढ केली जात आहे. तज्ज्ञ मानतात जर परिस्थिती आणखी बिघडली नाही तर येत्या दिवसांत ऊर्जा पुरवठा पूर्णपणे सामान्य होऊ शकतो, ज्यामुळे देशाला मोठा दिलासा मिळेल.

## राज्यातील हॉटेल, उपहारगृह चालकांना दिलासा; व्यावसायिक गॅस पुरवठ्यात २०% वाढ

**मुंबई (वृत्तसंस्था) :**

इराण विरुद्ध अमेरिका - इस्त्रायल युद्धामुळे अडचणीत सापडलेल्या राज्यातील हॉटेल, ढाबे व उपहारगृह चालकांसाठी एक आनंदाची बातमी आहे. केंद्र सरकारच्या निर्देशांनुसार व्यावसायिक गॅसचा पुरवठ्यात २० टक्क्यांची वाढ करण्यात येणार असल्याची माहिती राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी रविवारी दिली. यामुळे छोट्या व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

आखाती देशांत सुरू असलेल्या युद्धामुळे सरकारने व्यावसायिक गॅसच्या पुरवठ्यावर निर्बंध घातले होते. केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाने २१ मार्च रोजी जारी केलेल्या सूचनेनुसार यापूर्वी राज्याला केवळ ३० टक्के एलपीजी वाटप मंजूर होते. आता २३ मार्चपासून पुढील आदेश येईपर्यंत अतिरिक्त २० टक्के वाटप वाढवण्यात आले आहे.



नागरी व पुरवठा मंत्री छगन भुजबळांची माहिती

त्यामुळे राज्यातील एकूण गॅस पुरवठा हा संकटपूर्व पातळीच्या ५० टक्क्यांपर्यंत पोहोचणार आहे. या वाढीव २० टक्के गॅस पुरवठ्यात हॉटेल्स, ढाबे, उपहारगृहे, औद्योगिक कॅन्टिन, अन्न प्रक्रिया उद्योग व दुग्ध व्यवसायाला प्राधान्य देण्यात येणार आहे.

याशिवाय राज्य शासन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांकडून चालवण्यात येणाऱ्या अनुदानित कॅन्टिन, कम्युनिटी किचन्स तसेच स्थलांतरित मजुरांसाठी राबवण्यात येणाऱ्या योजनांनाही या निर्णयाचा लाभ मिळणार आहे. 'प्रस्तुत निर्णयामुळे व्यावसायिक एलपीजीच्या तुटवड्यामुळे अडचणीत आलेल्या हॉटेल व अन्नपदार्थ व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळेल. पण गॅस मिळवण्यासाठी त्यांना तेल विपणन कंपन्यांकडे नोंदणी करणे व पीएनजी जोडणीसाठी अर्ज करणे आवश्यक असणार आहे', असे छगन भुजबळ यांनी सांगितले आहे.

पान २ वर

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा भारतीय राजकारणात अनोखा विक्रम

- मोदी सर्वाधिक दिवस सरकार प्रमुख राहिलेले राजकारणी
- सीएम–पीएम म्हणून एकत्रितपणे सरकार प्रमुख म्हणून ८,९३१ दिवस पूर्ण
- पवन कुमार चामलिंगना मागे टाकले

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था) :**

भारतीय राजकारणात एक नवीन इतिहास रचत, पंतप्रधान नरेंद्र मोदी आता देशाचे सर्वाधिक काळ सरकार प्रमुख बनले आहेत. त्यांनी सिक्कीमचे माजी मुख्यमंत्री पवनकुमार चामलिंग यांचा विक्रम मोडला आहे. ही कामगिरी केवळ आकड्यांची बाब नाही, तर अनेक दशकांपासूनचे सातत्यपूर्ण नेतृत्व, जनतेचा पाठिंबा आणि राजकीय स्थिरतेची कहाणी आहे. पंतप्रधान मोदींनी एकूण ८,९३१ दिवस सरकार प्रमुख म्हणून काम पाहिले आहे. यामध्ये गुजरातचे मुख्यमंत्री आणि भारताचे पंतप्रधान म्हणून त्यांच्या कार्यकाळाचा समावेश आहे. यापूर्वी हा विक्रम पवन कुमार चामलिंग यांच्या नावावर होता. त्यांनी सिक्कीमचे मुख्यमंत्री म्हणून ८,९३० दिवस काम केले. पंतप्रधान मोदींची ही कामगिरी भारताच्या राजकीय इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा मानली जाते.




**गुजरातचे दीर्घकाळ मुख्यमंत्री**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ७ ऑक्टोबर २००१ रोजी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यांनी हे पद दीर्घकाळ भूषवले आणि त्यांच्या कार्यकाळात ते एकही निवडणूक हरले नाहीत. पंतप्रधानपदासाठी नामांकन मिळाल्यानंतर त्यांनी २०१४ मध्ये मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. नंतर, त्यांनी २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत प्रचंड विजय मिळवून पंतप्रधानपद पटकावले. त्यानंतर त्यांनी २०१९ आणि २०२४ मध्ये सलग निवडणुका जिंकल्या. त्यांनी आपल्या संपूर्ण राजकीय कारकिर्दीत एकही निवडणूक गमावलेली नाही.

मोदींच्या कार्यकाळात गुजरातने कृषी, उद्योग आणि पायाभूत सुविधांमध्ये लक्षणीय प्रगती केली आणि एक मजबूत राज्य म्हणून उदयास आले. २०१४ मध्ये जेव्हा त्यांना पंतप्रधानपदासाठी नामांकित करण्यात

पान २ वर



"मोदीजींच्या अनेक दशकांच्या सेवेने स्वतःचे असे एक युग घडवले आहे. मग ते गरिबांना त्यांचे हक्क मिळवून देणे असो, विकासाची नवी उंची गाठणे असो, किंवा जागतिक स्तरावर राष्ट्राचा सन्मान वाढवणे असो; 'मोदी युगाने' भारताचे चित्र आमूलाग्र बदलून टाकले आहे. या 'नव्या भारता'ची जडणघडण करण्यासाठी आजीवन प्रयत्नांची आवश्यकता होती आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तसे प्रयत्न केले. २४ वर्षांहून अधिक काळ एकही दिवस सुट्टी न घेता राष्ट्र आणि राष्ट्रातील जनतेची सेवा करणे, हे त्यांच्या अढळ निष्ठेचेच मूर्तिमंत रूप आहे. याच कारणामुळे, तीन वेळा गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून तर तीन वेळा भारताचे पंतप्रधान म्हणून जनतेकडून त्यांना अभूतपूर्व प्रेम लाभले आहे. जनतेचा त्यांच्यावरील विश्वास, प्रेम आणि पाठिंबा दिवसेंदिवस वाढतच आहे," असेही अमित शाह म्हणाले.

## मजबूत लष्करासाठी जागरुक नागरिक हवेत : राजनाथ सिंह

**घोराखाल (वृत्तसंस्था) :**

आजच्या काळातील युद्धे केवळ सीमांपुरती मर्यादित राहिलेली नाहीत; तर राष्ट्रीय सुरक्षेच्या कक्षेत आता आर्थिक, डिजिटल, ऊर्जा आणि अगदी अन्न सुरक्षेचाही समावेश झाला आहे. जागरुक आणि सुसज्ज नागरिकांच्या पाठिंब्यावर त्या देशाचे लष्कर मजबूत रहात असते. भारताला अशा जागरुक नागरिकांची गरज आहे, असे प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केले आहे. उत्तराखंडमधील घोराखाल येथील सैनिक शाळेच्या सुवर्णमहोत्सवी स्थापना दिन सोहळ्यानिमित्त दिलेल्या भाषणात राजनाथ सिंह बोलत होते.

राजनाथ सिंह म्हणाले की, संघर्षाचे स्वरूप आता मोठ्या प्रमाणात बदलले आहे. राष्ट्रे आता आर्थिक, सायबर, अंतराळ आणि माहिती युद्धाच्या धोक्यांना सामोरे जात आहेत. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने सदैव सतर्क आणि सज्ज राहणे अत्यंत आवश्यक बनले आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने सशस्त्र दलांना अत्याधुनिक शस्त्रे आणि तंत्रज्ञानाने सुसज्ज करण्यासाठी केलेल्या प्रयत्न वाखाणण्याजोगे आहेत.


नागरिकांनी-विशेषतः तरुणांनी- शिस्त आणि दृढनिश्चयाच्या माध्यमातून

पान २ वर

## हॉर्मूझची सामुद्रधुनी ४८ तासांत खुली करण्याचा अल्टिमेटम

### इराणचे ऊर्जा प्रकल्प नष्ट करण्याची अमेरिकेची धमकी

**तेलअवीव (वृत्तसंस्था) :**




तेलाच्या किंमती वाढत असल्यामुळे हॉर्मूझची सामुद्रधुनी खुली करण्यासाठी ट्रम्प यांच्यावर आता आंतरराष्ट्रीय पातळीवरून तसेच अमेरिकेतूनही मोठा दबाव येऊ लागला आहे. इराणने जर हॉर्मूझची सामुद्रधुनी ४८ तासात पुर्णपणे खुली न केल्यास इराणचे उर्जा प्रकल्प नष्ट करण्याचीधमकी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली आहे.मात्र अशा प्रकारे इराणच्या उर्जा प्रकल्पांवर कोणताही हल्ला झाल्यास अमेरिका आणि इस्त्रायलमधील उर्जा प्रकल्प आणि पायाभूत सुविधांवर हल्ले करून त्याला प्रत्युत्तर दिले जाईल, असे इराणने म्हटले आहे.

ट्रम्प यांनी नवीन हल्ले अधिक घातक असतील, असे म्हटले आहे. त्यांचा रोख इराणच्या बुशहरआण्विक प्रकल्प नष्ट करण्याकडे असावा, असा अंदाज व्यक्त होतो आहे. या प्रकल्पावर यापुर्वी गेल्याच आठवड्यात हल्ला झाला होता. याशिवाय राजधानी तेहरान जवळच्या दमावंद या नैसर्गिक वायू प्रकल्पाला लक्ष्य करण्याचा त्यांचा इरादा असावा. दरम्यान शनिवारी उशीरा इराणने इस्त्रायलच्या दक्षिणेकडील दोन वसाहतींवर क्षेपणास्त्रांचा मारा केले. त्यामध्ये इमारती उद्ध्वस्त झाल्या आणि; डझनभर जखमी झाले आहेत. हे दोन्ही हल्ले इस्त्रायलच्या मुख्य आण्विक संशोधन केंद्रापासून जवळच झाले आहेत.

चौथा आठवडा सुरू होत असताना हे युद्ध

पान २ वर

## देशांतर्गत विमान भाड्यावरील दर मर्यादा आजपासून हटणार




**नवी दिल्ली (वृत्तसंस्था):**

केंद्र सरकारने देशांतर्गत विमान भाड्यांवर लागू केलेली तात्पुरती कमाल मर्यादा हटवली आहे. मागील वर्षी इंडिगो विमानसेवेत झालेल्या मोठ्या अडथळ्यांमुळे ही मर्यादा लागू करण्यात आली होती. नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने जारी केलेल्या आदेशानुसार, विमान भाड्यांवरील ही मर्यादा हटवण्याचा निर्णय सोमवारपासून अंमलात येणार आहे. "यापूर्वी ६ डिसेंबर २०२५ ला नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने इंडिगोच्या विमानसेवेत मोठ्या प्रमाणावर अडथळे येत असताना, काही विमान कंपन्यांकडून आकारल्या जाणाऱ्या अवाजवी

पान २ वर

## भोंदू अशोक खरातचे सर्वाधिक पुरावे माझ्याकडेच

### फोटोवरून राजकारण नको; इंटेलिजन्सच्या आधारे आम्हीच भांडाफोड केली : मुख्यमंत्री

**मुंबई (वृत्तसंस्था) :**

भोंदूबाबा अशोक खरात यांच्याकडे विरोधी पक्षातील कोणकोणते नेते जात होते याचे मी पुरावे देऊ शकतो. माझ्याकडे सर्वांत जास्त पुरावे आहेत, पण ते पोलिसांकडे आहेत, ते पोलिसांचे काम आहे, खरातांना भेटणाऱ्यांपैकी कुणाचा यात सहभाग असेल तर कारवाई होईल, पण केवळ भेटलंय



म्हणून कारवाई करायला लागलो तर कोणी त्यांना ४० किमी पाण्याची लाईन दिली हे सर्वांना समजले आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भोंदूबाबा प्रकरणी हवेत बोलण्याला काही अर्थ नाही. खरात प्रकरण अत्यंत गंभीर आहे, त्या प्रकरणाचा भांडाफोडा आम्हीच केला आहे. या प्रकरणात महिला लाजेखातर पुढे येत नाही, पण पिडीत महिलांना त्यांच्या कुटुंबियांना धीर देत पुढे आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. यात काही महिला प्रतिसाद देत आहेत. प्रकरणाकडे लक्ष घालण्याच्या सूचना मी डीजींना दिल्या आहे ते या सर्व प्रकरणावर लक्ष ठेवून आहेत. एसआयटी आणि नाशिक सीपी मिळून हे काम पूर्ण करत आहेत. या प्रकरणी कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही.

पान २ वर

## ‘तारागिरी’ लवकरच नौदल ताफ्यात

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था):**

भारतीय नौदलासाठी एक महत्त्वाचा आणि अभिमानाचा क्षण लवकरच येणार आहे. ‘तारागिरी’ ही अत्याधुनिक स्टेल्थ युद्धनौका ३ एप्रिल २०२६ रोजी अधिकृतपणे नौदलाच्या ताफ्यात सामील होणार आहे. विशाखापट्टणम येथे होणाऱ्या या समारंभाला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह उपस्थित राहणार आहेत. या समावेशामुळे भारतीय नौदलाच्या क्षमतेत मोठी वाढ




होणार असल्याचे मानले जात आहे.

‘तारागिरी’ ही प्रोजेक्ट १७ एअंतर्गत तयार करण्यात आलेली चौथी युद्धनौका आहे. सुमारे ६ हजार ६७० टन वजनाची ही नौका ‘मेक इन इंडिया’ उपक्रमाचे उत्कृष्ट उदाहरण मानली जाते. ही युद्धनौका मझगाव डॉक शिपबिल्डर्स लिमिटेड येथे तयार करण्यात आली असून, तिच्या निर्मितीत सुमारे ७५ टक्के स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. देशभरातील २०० हून अधिक लघु आणि मध्यम उद्योगांनी या प्रकल्पात योगदान दिले असून, यामुळे रोजगारनिर्मितीलाही चालना मिळाली आहे.

पान २ वर




'लॅण्डक्राफ्ट स्पेसेस प्रा.लि. 'च्या माध्यमातून साकारलेल्या 'सावंतवाडी एन्क्लेव्ह' या महत्त्वाकांक्षी गृहप्रकल्पाचा लोकार्पण सोहळा अभिनेता सुनील बर्वे यांच्या हस्ते अत्यंत उत्साहात पार पडला. यावेळी लॅण्डक्राफ्ट स्पेसेस प्रा.लि.चे संचालक दिलीप छुगेरा, बीना छुगेरा, हर्षद राजाध्यक्ष, अमित वडनेरे तसेच प्रकल्प व्यवस्थापक धनंजय महाले, विक्री सहाय्यक शुभदा सावंत आदी मान्यवर उपस्थित होते.

## 'घर म्हणजे जगण्यासाठी विणलेलं सुंदर स्वप्न' : अभिनेता सुनील बर्वे

### 'सावंतवाडी एन्क्लेव्ह ' प्रकल्पाचे दिमाखात उद्घाटन ● लॅण्डक्राफ्ट स्पेसेसचा नवा व अभिनव उपक्रम

**सावंतवाडी (प्रतिनिधी):**

"घर म्हणजे केवळ चार भिंतींचा सांगाडा नसून, ते जगण्यासाठी विणलेलं एक सुंदर स्वप्न असतं. कोकणासारख्या निसर्गदत्त भूमीत, त्यातही सावंतवाडी रेल्वे स्थानकासमोर इतक्या देखण्या वास्तूत राहण्याचे तुमचे स्वप्न साकार होताना पाहून मनापासून आनंद होत आहे. तुमच्या या सुखाच्या क्षणी तुमच्या आनंदात सहभागी होता आले हे माझे भाग्य समजतो, " अशा शब्दांत प्रसिद्ध मराठी अभिनेते सुनील बर्वे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

मळगावस्थित सावंतवाडी रेल्वे स्थानकासमोर 'लॅण्डक्राफ्ट स्पेसेस प्रा.लि. 'च्या माध्यमातून साकारलेल्या 'सावंतवाडी एन्क्लेव्ह' या महत्त्वाकांक्षी गृहप्रकल्पाचा लोकार्पण सोहळा सुनील बर्वे यांच्या हस्ते अत्यंत उत्साहात पार पडला. यावेळी लॅण्डक्राफ्ट स्पेसेस प्रा.लि.चे संचालक दिलीप छुगेरा, बीना छुगेरा, हर्षद राजाध्यक्ष, अमित वडनेरे तसेच प्रकल्प व्यवस्थापक धनंजय महाले, विक्री सहाय्यक शुभदा सावंत आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा देताना बर्वे पुढे म्हणाले की, "लहानपणी स्वतःच्या हक्काच्या वास्तूत प्रवेश करताना जो आनंद आम्ही अनुभवला होता, तोच ओसंडून वाहणारा आनंद आज इथल्या सभासदांच्या चेहऱ्यावर दिसत आहे. हे घर तुम्हा सर्वांना सुख, समाधान आणि समृद्धी देणारे ठरो."

**निसर्गाच्या सानिध्यात स्वप्नपूर्ती**

कोकण हा पृथ्वीवरील दुसरा स्वर्ग मानला जातो. याच स्वर्गाच्या दारी, सावंतवाडीसारख्या सांस्कृतिक तालुक्यात अत्याधुनिक सोयीसुविधांनी युक्त असा हा प्रकल्प उभा राहिला आहे. उद्घाटनाच्या निमित्ताने बोलताना बर्वे यांनी या इमारतीत राहणाऱ्या सर्व रहिवाशांनी एका कुटुंबासारखे गुण्यागोविंदाने राहावे, अशी सदिच्छा व्यक्त केली. यावेळी त्यांचा व त्यांच्या पत्नीचा 'लॅण्डक्राफ्ट स्पेसेस'च्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

**कर्त्या हातांचाही सन्मान**

केवळ भव्य वास्तू उभी करणे नव्हे, तर ती उभी करणाऱ्या हातांचा गौरव करणे ही या सोहळ्याची जमेची बाजू ठरली. सुनील बर्वे आणि प्रकल्पाच्या संचालकांच्या हस्ते या गृहप्रकल्पासाठी अहोरात्र कष्ट घेणाऱ्या सर्व ठेकेदारांचा सन्मान करण्यात आला. लॅण्डक्राफ्ट स्पेसेस

पान २ वर